
# Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)

*Volume–VII,* *Special Issue–XIX,* *24th April, 2018*

*UGC Approved Journal No 48178, 48818* *ISSN 2278-5655,* *EduIndex Impact Factor 5.18*

One Day Interdisciplinary National Seminar

On

## "An Interdisciplinary Approach towards Humanities and Business: Today's Demand of Progress"

Organized by

Vidya Mandir Mandal,

## MATOSHREE SUMATI CHINTAMANI TIPNIS COLLEGE OF ARTS & COMMERCE

(Affiliated to University of Mumbai )

Mamdapur- Neral (W), Tal- Karjat, Dist- Raigad 410 101.

www.matoshreesctipniscollege.com


**Chief Editor**

Dr.Nandkumar Ingale

**Sub-Editors**

Prof. Shramik Kharat
Dr. Snehal Deshmukh
Prof.Sagar Mohite
Prof. Santosh Turukmane
Prof. Amol Sonawane
Prof. Krishna Jambhekar
Prof. Jayalaxmi Mane

Vidya Mandir Mandal,Mahim, Mumbai - 400 016

# MATOSHREE SUMATI CHINTAMANI TIPNIS COLLEGE OF ARTS & COMMERCE

(Affiliated to University of Mumbai)

Mamdapur- Neral (W), Tal- Karjat, Dist- Raigad 410 101.

Email: msctipnis@gmail.com

Website: www.matoshreesctipniscollege.com

Organizes

*One Day Interdisciplinary National Seminar*

On

# "AN INTERDISCIPLINARY APPROACH TOWARDS HUMANITIES AND BUSINESS: TODAY'S DEMAND OF PROGRESS"

Wednesday, 07th March, 2018

**Chief Editor**

Dr.Nandkumar Ingale

**Sub-Editors**

Prof. Shramik Kharat

Prof. Santosh Turukmane

Dr. Snehal Deshmukh

Prof. Amol Sonawane

Prof.Sagar Mohite

Prof. Krishna Jambhekar

Prof. Jayalaxmi Mane

## INDEX


| Sr. No. | Title | Author | Page No |
|---|---|---|---|
| 1 | The History Of Asia's First Shrine Dedicated To Our Lady Of Fatima In Karjat, India. | Prof. Afegine A. Tuscano | 1 |
| 2 | Archaeology And Skill Development For The Archaeologists | Prof. Payal Shrikant Shinde | 5 |
| 3 | रायगड जिल्ह्यातील आदिवासी जमातीचा सामाजिक व आर्थिक अभ्यास | डॉ.एस.एच.खान | 9 |
| 4 | Impact Of Globalization On Higher Education In India | Prof. Sachin V. Phalke | 13 |
| 5 | सामाजिक सुधारणा चळवळीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान -अस्पृशता व जातीव्यवस्था | प्रा.घुटे.जी .एम | 15 |
| 6 | रायगडावरील महाराष्ट्रीयन इतिहास लेखन | प्रा.तारू एन.एम. | 18 |
| 7 | Industrial Development In Eastern Suburban Mumbai In Post Independence Period | Prof. Snehal Nagtilak | 21 |
| 8 | E. V. Ramasamy Naicker's Social Reformation A Review | Prof. M. G. Lone | 24 |
| 9 | मराठे कालीन जाती व समाज | प्रा.मिलिंद घाडगे | 27 |
| 10 | The Orientalist William Jones | Prof. Annjum Sayyed | 29 |
| 11 | Rajarshi Shahu Chhatrapati And His Boarding Houses Movement In Kolhapur: A Study Of Rural Progress In Maharashtra | Prof. Kharat Shramik Sopan | 31 |
| 12 | Environmental Activism: Literature, The Road Uphill | Dr. Sunila Pillai | 37 |
| 13 | Ecospiritual Leanings Of Female Characters In Louise Erdrich' Selected Novels (Love Medicine, Tracks) | Prof. Vinod Zalte | 39 |
| 14 | Eco-Consciousness In The Odes Of Pablo Neruda | Prof. Madhumanti Dasgupta | 42 |
| 15 | Strategies Of Detection And Crime In Kalpana Swaminathan's "Tulsi Villa": A Tragic Story Of The Loss Of The Ideal Home. | Prof. Maria Shaikh | 45 |
| 16 | Gender And Genre: An Interdisciplinary Reading Of Mary Kom's Autobiography – "*Unbreakable*" | Prof. Micky Barua | 48 |
| 17 | Mirrors Of Cultural Poetics In Tariq Ali's A Sultan In Palermo | Dr. Neeta Chakravarty, | 51 |
| 18 | Eco-Spiritual Perception In David Suzuki's The Sacred Balance: Rediscovering Our Place In Nature | Prof. Sunil Krushna Gondhali | 53 |
| 19 | A Study Of Socio-Cultural Radicalism Represented In Sharankumar Limbale's Novel Hindu | Mr. Prakash Punjairao Dhule | 56 |
| 20 | Intolerance And Protest In Rohinton Mistry's Such A Long Journey | Ms. Ashwini Dhanavade | 59 |
| 21 | Reflection Of Nature In Robert Frost's Poetry | Ms. Hemangi Nana Saindane | 62 |
| 22 | Nepali – American Woman's Personal And Hybrid Identity In A New World Gets Interlink In Manjushree Thapa's Novel Seasons Of Flight. | Ms. Dipika Kolambe | 65 |
| 23 | Emergence Of A Globalized Metro sexual Masculinity In Select Travel Blogs: A Transdisciplinary Perspective | Prof. Sundari Johnson | 68 |

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | आदिवासी वरील अन्याय व त्यांची चळवळ | प्रा.राजू शनवार | 71 |
| 25 | मराठी साहित्यातील नवे प्रवाह :ग्रामीण कादंबरी | प्रा.मोहन पाटील | 73 |
| 26 | मराठी साहित्यातील नव समाजाचे भान | प्रा.यादव मोरे | 76 |
| 27 | नव्वदोत्तरी मराठी कवितेतील नवे समाजभान | प्रा.रंजिता वीरकर | 82 |
| 28 | प्रज्ञा दया पवार आणि कविता महाजन यांची दीर्घ कविता | प्रा.शिल्पा नेवे | 84 |
| 29 | सहित्यातील सामाजिकता :एक आकलन (एस ई झेड च्या निमित्ताने ) | प्रा.संजय निचिते | 88 |
| 30 | दलित आत्मकथनातील समाजदर्शन | डॉ.सुमन जाधव | 90 |
| 31 | अलिबाग तालुक्यातील आगरी साहित्यिकांचे योगदान (आगरी बोलीच्या संदर्भात) | प्रा.नम्रता पाटील | 94 |
| 32 | मराठी भाषेतील विविध बोलींचा अभ्यास | डॉ.ओमकार पोटे | 98 |
| 33 | नव्वदोत्तरी मराठी कवितेतील नवसमाजभान | प्रा.अनिल साबळे | 103 |
| 34 | संत साहित्याचा तरुणावरील पडणारा प्रभाव | डॉ.नंदकुमार इंगळे | 107 |
| 35 | कर्जत तालुक्यातील कातकरी जमातीचे लोकजीवन ,लोकसंस्कृती आणि शिक्षण | प्रा.संतोष तुरुकमाने | 110 |
| 36 | तोकोनामा आणि पूर्वरंग मधून चित्रित झालेली जपानी संस्कृती | प्रा.अनुजा कानडे | 115 |
| 37 | आगरी साहित्यातील आगरी समाज वास्तव्य | डॉ.अलका पवार | 118 |
| 38 | Poverty And Social Justice: Enigma Of All Societies | Prof. Grace Verghese | 121 |
| 39 | Transgender Initiatives: A Wake-Up Call For A Diffident Society | Prof. Suju Gujar | 123 |
| 40 | Higher Education And Skills Development With Special Reference To Students Of Political Science | Prof. Steven A. Lobo | 126 |
| 41 | Adoption Of Villages: A Best Practice | Prof. Sandip Shinde & Prof.Sanjay Chakane | 130 |
| 42 | Upskilling And Reskilling: Need For The Future Sustenance Of Libraries | Prof. Kiran Raikar | 135 |
| 43 | उत्तराधीकार में स्त्री मुक्ती का स्वर | डॉ.मिथिलेश शर्मा | 138 |
| 44 | Contemporary Scenario Of Dalit's Problems In So Called Development Of LPG | Prof. Shelke Suryakant Laxmanrao | 141 |
| 45 | India Africa Trade And Investment Relations (1990-2010) | Prof. Dhananjay Kotangale, Prof. Shramik Kharat | 145 |
| 46 | मराठी साहित्य आणि सामाजिक शस्त्रांचा परस्पर अनुबंध मराठी साहित्यातील अपंग स्त्रीजीवन :चाकाची खुर्ची आणि तिची कहाणी च्या संदर्भात | प्रा.अरविंद जाधव | 152 |
| 47 | साहित्य आणि सामाजिक शास्त्रे अंत:संबंध | प्रा.राजश्री कदम | 154 |
| 48 | "मास मिडिया " च्या विद्यार्थ्यांना वृत्तपत्र वाचनाचे महत्व | प्रा.रजनी कुचे | 157 |
| 49 | Sensuousness in the Odes of John Keats | Prof. Jayalaxmi Mane | 160 |
| 50 | संत रामदासाच्या साहित्यातील पर्यावरण विचार | डॉ.प्रतिभा टेंबे | 164 |

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | आदिवासी वरील अन्याय व त्यांची चळवळ | प्रा.राजू शनवार | 71 |
| 25 | मराठी साहित्यातील नवे प्रवाह :ग्रामीण कादंबरी | प्रा.मोहन पाटील | 73 |
| 26 | मराठी साहित्यातील नव समाजाचे भान | प्रा.यादव मोरे | 76 |
| 27 | नव्वदोत्तरी मराठी कवितेतील नवे समाजभान | प्रा.रंजिता वीरकर | 82 |
| 28 | प्रज्ञा दया पवार आणि कविता महाजन यांची दीर्घ कविता | प्रा.शिल्पा नेवे | 84 |
| 29 | सहित्यातील सामाजिकता :एक आकलन (एस ई झेड च्या निमित्ताने ) | प्रा.संजय निचिते | 88 |
| 30 | दलित आत्मकथनातील समाजदर्शन | डॉ.सुमन जाधव | 90 |
| 31 | अलिबाग तालुक्यातील आगरी साहित्यिकांचे योगदान (आगरी बोलीच्या संदर्भात) | प्रा.नम्रता पाटील | 94 |
| 32 | मराठी भाषेतील विविध बोलींचा अभ्यास | डॉ.ओमकार पोटे | 98 |
| 33 | नव्वदोत्तरी मराठी कवितेतील नवसमाजभान | प्रा.अनिल साबळे | 103 |
| 34 | संत साहित्याचा तरुणावरील पडणारा प्रभाव | डॉ.नंदकुमार इंगळे | 107 |
| 35 | कर्जत तालुक्यातील कातकरी ज़मातीचे लोकजीवन ,लोकसंस्कृती आणि शिक्षण | प्रा.संतोष तुरुकमाने | 110 |
| 36 | तोकोनामा आणि पूर्वरंग मधून चित्रित झालेली जपानी संस्कृती | प्रा.अनुजा कानडे | 115 |
| 37 | आगरी साहित्यातील आगरी समाज वास्तव्य | डॉ.अलका पवार | 118 |
| 38 | Poverty And Social Justice: Enigma Of All Societies | Prof. Grace Verghese | 121 |
| 39 | Transgender Initiatives: A Wake-Up Call For A Diffident Society | Prof. Suju Gujar | 123 |
| 40 | Higher Education And Skills Development With Special Reference To Students Of Political Science | Prof. Steven A. Lobo | 126 |
| 41 | Adoption Of Villages: A Best Practice | Prof. Sandip Shinde & Prof.Sanjay Chakane | 130 |
| 42 | Upskilling And Reskilling: Need For The Future Sustenance Of Libraries | Prof. Kiran Raikar | 135 |
| 43 | उत्तराधीकार में स्त्री मुक्ती का स्वर | डॉ.मिथिलेश शर्मा | 138 |
| 44 | Contemporary Scenario Of Dalit's Problems In So Called Development Of LPG | Prof. Shelke Suryakant Laxmanrao | 141 |
| 45 | India Africa Trade And Investment Relations (1990-2010) | Prof. Dhananjay Kotangale, Prof. Shramik Kharat | 145 |
| 46 | मराठी साहित्य आणि सामाजिक शस्त्रांचा परस्पर अनुबंध मराठी साहित्यातील अपंग स्त्रीजीवन :चाकाची खुर्ची आणि तिची कहाणी च्या संदर्भात | प्रा.अरविंद जाधव | 152 |
| 47 | साहित्य आणि सामाजिक शास्त्रे अंत:सबंध | प्रा.राजश्री कदम | 154 |
| 48 | "मास मिडिया " च्या विद्यार्थ्यांना वृतपत्र वाचनाचे महत्व | प्रा.रजनी कुचे | 157 |
| 49 | Sensuousness in the Odes of John Keats | Prof. Jayalaxmi Mane | 160 |
| 50 | संत रामदासांच्या साहित्यातील पर्यावरण विचार | डॉ.प्रतिभा टेंबे | 164 |

# मराठी साहित्यातील नव समाजाचे भान

**प्रा. यादव धोंडूजी मोरे**
*मराठी विभाग, सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर*
*(मुंबई विद्यापीठाशी संलग्नित)*

इ. स. १८१८ ला पेशवाईचा अस्त झाला आणि भारतीय राजकारणाची सत्तासुत्रे इंग्रजांनी ताब्यात घेतली. याचबरोबर १९२० ला ठिळकांचा अस्त झाला आणि भारतीय राजकारणांची सत्तासुत्रे गांधीजीनी आपल्या ताब्यात घेतली. गांधीजीनी दिलेल्या हाकेने खेडयाकडे 'चला' अशी हाक दिली.

१९ व्या शतकाच्या आरंभी जन्माला येऊ लागलेले आधुनिक मराठी साहित्य हे प्राचीन व मध्ययुगीन साहित्याच्या तुलनेत प्रकृतीने अंतर्बाह्य भिन्न असलेले दिसून येते. आधुनिक समाजातील भारतीय साहित्य क्षेत्रापुरता त्यातल्या त्यात आधुनिक मराठी साहित्य क्षेत्रापुरता मर्यादित विचार करायचा झाला तर असे म्हणता येईल की, प्राचीन मराठी साहित्य हे धर्मप्रवण, आध्यात्मिक पारलौकिक मूल्यांनी प्रेरित होते तर आधुनिक मराठी साहित्य हे भौतिक इहलौकिक जीवन वादाचा पुरस्कार करणारे होते.

आधुनिक मराठी साहित्याची संकल्पना ही गतिमान समाजाच्या प्रवाहाबरोबर एकनिष्ठ राहणारी, त्याचबरोबर आधुनिक युगाची जी सर्वमान्य मूल्ये आहेत. आधुनिक समाज जीवनात समता, स्वातंत्र्य, बंधुता या धर्मनिरपेक्ष लोकशाही मूल्यांना प्रतिष्ठा आहे. त्याचबरोबर विज्ञाननिष्ठ व्यापक मानवी नितिमत्ता, व्यक्ती व समाज यांच्या जीवनात सुंदरता आणणारी आहे. समाजाचे कल्याण लक्षात घेऊन जबाबदारीने व्यक्तीने वर्तन आणि आचरण केले पाहिजेत असे आधुनिक समाज मानतो. म्हणजे व्यक्ति विशिष्ट समाजनिष्ठा यांनाही आधुनिक साहित्यात मूल्यांच्या पातळीवर स्थान असते. त्यातूनच आधुनिक साहित्यात वेळोवेळी व्यक्तिनिष्ठ आणि सामाजिक पातळीवर प्रयोग, परिवर्तन होतात. उदा. वैयक्तिक पातळीवर आत्मविष्कार, विद्रोह, रोमॉंटिकवृती प्रयोगशीलता यांनाही स्थान असू शकते आणि सामाजिक पातळीवर दलित, ग्रामीण, आदिवासी, भटके, फुलेवादी, आंबेडकरवादी, सावरकरवादी इत्यादी परिवर्तनवादी साहित्य निर्मितीलाही स्थान असू शकते. यामुळे आधुनिक मराठी साहित्य हे प्रवाही, प्रयोगशील, परिवर्तनवादी, विकसनशील, पुरगामी, नवतावादी इत्यादी विशेषणांनी युक्त होऊन समाजप्रवाहाच्या हातात हात घालून सतत काळाबरोबर वाटचाल करतांना दिसते.

इ. स. १८२० ते १९७० या दिडशे वर्षातील आधुनिक मराठी साहित्याने आपल्या प्रवाहाच्या निरनिराळया टप्प्यांवर अनेक वळणे घेतलेली आहेत. त्या टप्प्यांवर त्याच्या अगोपागाया विकास होत गेला आहे. सत्तर ते ऐशींच्या दशकात दलित, ग्रामीण साहित्याच्या चळवळी आपआपल्या मार्गानी आकार घेतांना दिसतात.

यातूनच महाराष्ट्रात १८५० च्या आसपास हळूहळू मराठी समाजात नवा सुशिक्षित ब्राम्हणवर्ग तयार झाला. ब्रिटिश शिक्षण व्यवस्थेत प्राशात्य साहित्याचा समावेश असल्याने या नव्या सुशिक्षित ब्राम्हण वर्गाला त्या साहित्याचा परिचय झाला. परिणामी आधुनिक मराठी साहित्याचा स्त्रोत नव्या मराठी समाजाच्या सांस्कृतिक अंगाचा एक भाग म्हणून आकार घेऊ लागला. त्यातूनच अनेक मराठी साहित्यिक पुढे आले. तथाकथित आधुनिक मराठी साहित्याची प्रस्थापना झाली. पुढे त्यालाच प्रवाह स्वरूप प्राप्त झाले.

देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत तरी आधुनिक मराठी साहित्यावर ब्राम्हण वर्गाचे वर्चस्व होते. या वर्चस्वामुळे व त्या वर्गाच्या सुशिक्षितपणामुळे त्या वर्गाचेच अनुभवनिष्ठ मराठी साहित्यात आविष्कृत होते राहिले. त्या वर्गाच्या विचारविश्वाच्या कक्षेत येणारे नव नवे प्रवाह, विकासाच्या नवनव्या कल्पना, साहित्य निर्मितीच्या नवनव्या कल्पना, समाजशास्त्र, मानसशास्त्र यांच्यात नवनवी भर पडून त्याच्या आधारे नवसमाजरचना मनाची नव्याने कळलेली रचना याचाही प्रभाव त्या त्या वेळी मराठी साहित्यावर पडला आणि ते विविध नांवानी ही वळणे ओळखली जात असत. उदा. जीवनवादी, कलावादी, मनोरंजनवादी, वास्तववादी, अतिवास्तववादी, मनोविश्लेषणावादी, व्यवस्ततावादी, संरचनावादी, प्रयोगशील, विरचनावादी इ. नवी नावे, नव्या संकल्पना त्यावेळी रूढ होत असत. हे सगळे होत असले तरी समग्र समाजाचे दर्शन त्यात काही होन नसे प्रामुख्याने ब्राम्हण समाज, त्यांच्या सुधारणा, त्याचे कुटूंब, त्याचे ताण–तणाव, त्याचे त्या वर्गातर्गत समाजदर्शन एवढयापुरते मर्यादित होते. य्यरेग्राफ म्हणून म. फुले यांचे सर्व साहित्य, धुनधारी यांची पिराजी पाटील ही कांदबरी, ह. ना. आपटे यांची एखादी कथा श्री. म. मारे यांचे साहित्य इत्यादीचा उल्लेख करावा लागतो.

इ. स. १९२० नंतर ही कोंडी हळूहळू फुटतांना दिसते. साम्यवादाच्या प्रभावामुळे मुंबईच्या कामगार विश्वावर, भा. वि. वरेरकर लिहू लागले. वि. स. सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई, वा. द. सातारकर इ. मंडळी प्रादेशिक जीवनाचे आणि उपेक्षित समाज घटकाचे चित्रण करू लागली. गांधीवादी तत्वज्ञानाचा प्रभाव हळूहळू त्यावेळच्या मराठी साहित्यावर पडू लागला. त्यातून कोकणातील, देशावरील, मराठवाडयातील, विदर्भातील ग्रामीण समाजाचे वास्तव चित्रण मर्यादीत का होईना पण मराठी साहित्यात येऊ लागले.

इ.स. १९२० ला टिळकांचा अस्त झाला. आणि भारतीय राजकारणाची सत्तासूत्रे गांधीजींनी आपल्या ताब्यात घेतली व भारताचा राज्यकारभार सुरू झाला. गांधीजीनी आपल्या नव्या मंत्रातून **'खेडयाकडे चला'** अशी हाक दिली त्यामुळे देशातील घटणीतील खेडयाच्या महत्वपूर्ण स्थानाचे वाढते. भान सुशिक्षितांना झाले. ग्रामीण समाजाची वैचारिक नांगरणी सत्यशोधक समाजाने केली. साम्यवादाचे विचारमंथन ही शेतकरी कामगाऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यास कारणीभुत ठरले. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव

पाटील या समाज प्रवोधकांच्या परिवर्तनवादी चळवळींनी ग्रामीण समजाला समाजभिर्मूख केले. नागर समाजाची दृष्टी वेधण्यासाठी आणि ग्रामीण समाजाची जाण वाढण्यासाठी, या सर्व गोष्टी आपआपल्या परीने पूरक ठरल्या.

मानवी जीवन कथेत घेणाऱ्या किंवहूना जीवनाशी निगडीत झालेल्या सर्व घटकांचा त्यात समावेश झाला असून निसर्ग आणि मानवी जीवन यांच्या संघर्ष समन्वयातून हे सारे कथाविश्व साकार होत गेलेले दिसते. त्यात निसर्गातील अद्भूत चमत्कार आहेत. वृक्षवनस्पती आहेत. फळे, फुले आहेत, पशू पक्षी आहेत आणि साक्षात मानवी जीवनही आहे.

शंकरराव खरातांची कथा ही समाजाच्या अधःस्तरातील दलित समाजाचे प्रातिनिधीक चित्रण करणारी कथा आहे. उदाः उपेक्षित जीवन याचे वास्तव चित्रण त्यांनी केले आहे. आपल्या समाजातील सुख – दुःखाचे धागेदोरे त्यांनी अचुकपण मांडले आहेत. त्यांच्या पुढील प्रमाणे **'बारा बलुतेदार'**, 'तडीपार', 'दौंडी', 'टिटवीचा फेरा' आणि 'सांगावा' हया कथा सकस आहेत.

खरातांनी ग्रामीण जीवनातील दलित अस्पृश्य वर्गाची सुख–दुःख, त्यांच्या भावभावना, त्याचे विचार, त्यांच्या श्रध्दा, अंधश्रध्दा, त्यांचे दारिद्रय इ. जे पाहीले ते सांगितले आहे.

'सांगावा' कथेतील रामा, लाकडाच्या भाराने तो करकरा लवत होता. अंगाच्या निबंर फासोळया उठून दिसत होत्या. भकाळी पोट भात्यासारखे खालवर होत होते. वेलदाराच्या गाढवागत त्याने मसणवटीत खेपा टाकल्यांचा चारच वाक्यातून खरातांनी मूर्तीमत दारिद्रयाने आणि उपासमारीने खंगलेल्या रामाचे चित्र उभे केले आहे. त्याचे कपडे देखील अंगणातील पैरण, धोतराचा धडूता, डुइचं पागुट, आणि घोंगडयांचा पटकार बस! इतकेच आहेत. असा ह रामा खाली मुंडी घालून घाम गाळणारा आपल्या घरची 'थंड चूल' पेटावी म्हणून धडपडतो आहे. पण या महारांचे दर्शन देखील अशुभ मानणऱ्या माणसांना त्याची दया येत नाही. त्यांच्या भावना समजू शकत नाही हीच त्याची व्यथा लेखकाने अत्यंत परिणामकारक मांडली आहे.

अडाणी अशिक्षित म्हणून उपेक्षित राहिलेल्या या लोकांना साधी माणूसकी देखील दाखविली जात नाही. मात्र तीच माणसे निष्ठेने, प्रेमाने, आणि नेकीने आपली कामे करीत असतात. सामाजिक अन्याय सहन करीत ही माणसे खचून, पिचून गेलेली दिसतात.

झोपेत जाग्या झालेल्या रामाच्या लहान मुलाने वा, भाकरी आपली? असा केविलवाणी प्रश्न विचारावा यात अतिशय भेदकता सामावली आहे. त्या मुलाचा प्रश्न हा काल प्रश्न न राहता जाणत्या समाजधुरीनाच केलेले हे आवाहन आहे असे वाटते. कोणत्याही प्रकारचे भाष्य अगर उपदेश न करता केवळ रामाच्या चित्रणातून उभी राहीलेली ही कथा उपेक्षित वर्गाचे दुःख अत्यंत प्रभाविपणे नजरेस आणून देते.

द. मा. मिरासदार या कालखंडातील महत्वाचे लेखक म्हणून त्याचा उल्लेख केला जातो. माडगूळकराप्रमाणे ग्रामीण कथा लिहिण्याचे श्रेय द. मा. मिरासदार व शंकर पाटील यांच्या कथेकडे जाते. मिरासदारांनी मराठी वाङ्मयात विनोदी कथा लिहिण्याचे काम केले. विनोदी कथेत निवेदनाची चातूरी असल्याशिवाय विनोद खुलणार नाही. मिरासदारी शैली मराठी साहित्यात अवतरण्यांचे कार्य त्यांनी केले आहे. मिरासदारांनी पुढील **'माझ्या बापाची पेंड'**, **'भुताचा जन्म'**, **'ताजमहल'**, **'हुबेहुब'**, **'चुटक्याच्या गोष्टी'**, **'गफलता'**, **'विरंगुळा'**, **'चकाटयाचास्पर्श'**, **'गप्पागोष्टी'**, **'भोजनाऊ'**, इ. कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत.

कहाणी ही ग्रामीण संस्कृतीशी जिव्हाळयाने निगडीत आहे. खेडयातील पारावर व चावडीवर ती वाढली. तेव्हा 'गावाकडच्या गोष्टी' किंवा 'गावरान' गोष्टी सांगण्यासाठी कहाणीची गोष्टीची शैली सुसंगत आहे. या दृष्टीने परंपरागत घाटातून नव्या आशयाची कथा सांगण्याची मिरासदारांची कामगिरी मोलाची आहे.

भूताचा जन्म या कथेतील तुकाराम लांडगेच्या रेखीव, पहाडी, व्यक्तिमत्वाचे दर्शन घडवून गुंडगुळयाच्या माळावर भूताच्या भितीने त्याची उडालेली घाबरगुंडी म्हणजे परस्पर विरोधातून नेमकेपणाने टिपलेल्या विनोदाचेच दर्शन होय. त्या माळावरून हा बलदंड माणूस घाबरून गुरासारखा ओरडत एकदाही मागे न पाहता ठेचकाळात धडपडत धावत सुटतो. त्याची छाती भात्यासारखी वर खाली होऊ लागते आणि तरीही तुकाराम लांडगे गुंडगुळयांच्या माळावर भुताशी आपण कशी कुस्ती केली याचे फक्कड वर्णन सांगत असतो.

शंकर पाटील यांचे कथासंग्रह पुढील प्रमाणे त्यांनी लिहिले आहेत. बहुजनांचे उपेक्षित जीवनक्षेत्र मुख्यतः ग्रामीण कथेने मराठी साहित्यात आपले शंकर पाटील यांनी वळीव, १९५८, भेटीसाठी, १९६० इत्यादी कथेसंवंधीच्या नव्या कलादृष्टीचा प्रत्यय त्यांच्या कथा साहित्यात शंकर पाटील हे एक प्रयोगशील कथाकार आहेत व माडगूळकरांच्या कथेत न येणाऱ्या मनोविश्लेषण, संज्ञाप्रवाह या गोष्टीचा ते वापर करतात.

पाटीलांच्या स्वभावाला विनोदाचे अंग असले तरी त्यांनी प्रकृती मुलतः जीवनाच्या करूणगंभीर नात्यातच खरीखुरी रंगते त्यांच्या वळीव मधील कथांतून हे दुसरे पाटील आपल्याला सतत दिसतात. 'खइडा', 'माहेर', 'दसरा', 'भुजंग', 'ऊन' या कथांतुन खेडयातील स्त्रीचे काबाडकष्ट सोशिकपणा, दुसऱ्यासाठी झिजणे, पण त्याचबरोबर तिचे कुटूंवातील केंद्रस्थान ते रंगवतात.

पाटलांनी खेडयातील कुटूंवात प्रामुख्याने स्त्रीला महत्व असल्याने माता, कारभारीन, वहीनी, बहीण, मुलगी, सासूरवाशीण, नणंद, शेजारीन, भावजय इ. अनेक नात्यातील तिची रूपे आपणासमोर येतात.

द. मा. मिरासदार, उध्दव शेळके, शंकरराव खरात, मनोहर तल्हार, वामन इंगळे, मधुकर केचे, शंकर पाटील, बाजीराव पाटील, चंद्रकात भालेराव, रा.र. वोराडे, आनंद यादव असे अनेक ग्रामीण कथालेखक या काळात उदयास आले. या माणदेशी माणसाबरोबर कोकण, वऱ्हाड, खानदेश, मराठवाडा या प्रदेशातील ग्रामीण माणूसही कथेतून आपले अनुभव वोलू लागला.

इ.स. १९६० च्या सुमारास मराठी कथेत काही नवीन प्रवृत्ती दृष्टीस येऊ लागल्या. साहित्याच्या जवळजवळ सर्वच क्षेत्रात एक नवी पिढी उदयास आलेली दिसते. कथाक्षेत्रात जी.ए.कुलकर्णी, कमल देसाई, दि.पु.चित्रे, चि. त्र्य. खानोलकर या सर्व लेखकाचे साहित्य वाचत

असतांना काही गोष्टी प्रामुख्याने जाणवतात. नजरेत भरणारी पहीली गोष्ट म्हणजे या लेखकांची वाङ:मयाविषयीची भूमिका या लेखकाच्या लेखी वाङ:मय हे एक साधन नसून जीवनाचे ते एक माध्यम आहे. अशा गांभीर्यान त्यांनी वाङ:मय निर्मिती केली आहे.

दुसरी गोष्ट, मानवाच्या सद्य—जीवनाबद्दलच नव्हे तर एकंदर मानवी अस्तित्वाबद्दलच्या अगदी मूलभुत प्रश्नांच्या अनुरोधाने जीवन मुळापासुन पूर्णपणे जाणून घेण्याची तळमळ व धडपड या लेखकांच्या वाङ:मयातून दिसते.

या लेखकांच्या लेखनातुन आणखी एक गोष्ट जाणवते की ती ही की हे वाङ:मय पूर्वीच्या वाङ:मयापेक्षा वेगळया प्रकारचे आहे. या लेखकांच्या साहित्यातून जे जीवनदर्शन घडते किंवा जीवनाचा जो अन्वयार्थ लावलेला आढळतो त्यामागे काही विशिष्ट विचारसरणी दिसून येते.

अस्तित्ववादी साहित्य :— दुसऱ्या महायुध्दाच्या काळापासुन कामू, इलियट, हेमिंग्वे, आपल्या शेवटच्या लेखनात वेल्स व मॅम्यू अल बेकेट, कापका, मॉरियस, विल्यम कॉलिन्स इ. लेखकांनी व विचारवंतानी अस्तित्ववादाने विचारात घेतलेल्या मानवासमोरील समस्या हाताळल्या आहेत. माणसे ही जीम भ्वससवू डमद .........जीम `जर्नमिक डमद आहेत अशी जाणीव इलिएटला झाली होती. हेमिंग्वने आपल्या जीम वसक डंद टक जीम`मंए मध्ये जीवन म्हणजे मानव नियती यांचे अखंड व्दंव्द या दीर्घ कथेत नियतीने अखेर जिंकली तरी मानाने, त्याच्यातील मनुष्यत्वाने माणूस अजिंक्य राहील आहे. म्हणून जीवन ही माणसांची शोकांतिका नाही असेच हेमिंग्वे या कथेतून सूचवितो.

अस्तित्ववाद आज एका बध्दतेत वा वर्तूळात सापडला असला तरी त्याने आजच्या मानवाला एक नवे भान दिले आहे. मानवी अस्तित्वासंबंधी नव्या जाणीवा करून दिल्या आहेत. व कलावंताच्या दृष्टीला नवे परिमाण देऊन कलेचे क्षेत्र व्यापक व सखोल केले आहे हे नाकारता येत नाही. चित्रे, जी.ए.कुलकर्णी, नेमाडे, कमल देसाई, खानोलकर, भाऊ पाध्ये यांच्या लेखनात हे नवे भान व नवी दृष्टी असल्याचे दिसते. त्यांनी हया विचारप्रणाली संपूर्णतः स्वीकारल्या की नाही कोण जाणे पण त्यांच्या अनुभव घेण्याच्या पध्दतीत या नव्या जाणीवामुळे फरक पडलेला त्यांच्या वाङ:मयात दिसून येतो.

आजच्या नव्या पिढीच्या कथावाङ:मयाकडे वळले म्हणजे जी.ए.कुलकर्णी, कमल देसाई, चित्रे, खानोलकर व तेंडुलकर ही नावे या तत्वप्रणालीच्या संदर्भात प्रामुख्याने पुढे येतात. त्यांचाच विचार या कथावाङ:मयात केलेला आहे.

जी.ए.कुलकर्णी यांचे कथासंग्रह पाहिले तर काही गोष्टी लक्षात येतात. 'निळा सावळा' (१९५९), 'पारवा' (१९६०), हिरवे रावे (१९६३), 'रक्तचंदन' (१९६६), 'काजळमाया' असे जि.ए चे कथासंग्रह आहेत. त्यातील 'चंद्रावळा', 'गुंतवळ', 'मुखवटा', शॅलौट, 'वळी', 'सोडवण', 'पुरूष' अशा एकापेक्षा एक वरचढ कथा आशय घनतेने व महाकाव्यात्मक गुणांनी भरलेल्या आहेत.

सोडवण मधील डॉ. फाटक, डॉ. दातेकडे पाहुन मनाशी म्हणतो, आयुष्यातील कारण आणि परिणाम यांची स्पष्ट कल्पना करून सदैव स्वच्छ सुर्यप्रकाशात निःशंक जगणारी पुष्कळ अत्यंत मुर्ख व उथळ माणसे असतात त्यापैकी तो एक त्याला काय सांगायचे? आणि त्याला समजणार तरी काय? कागदाची घडी घालावी त्याप्रमाणे त्याने सांगितल्या प्रमाणे आपल्या जीवनाची घडी घालून ठेवली आहे.

'सोडवण' मध्येच डॉ. फाटकाचा जूना मित्र दिवगी त्याला म्हणतो हे अशादी असंच व्हावे हे फार पूर्वीचे कुणीतरी लिहून ठेवलं होत. ते सारं 'ब्लूप्रिंट' प्रमाणे झाले मी ओळखले. मी ओळखंल. मी जन्मलो ना, त्याचवेळी मी हा नंबर काढला. हेच तिकीट माझ्या नावाने ठेवण्यात आले होते. असे माणसांच्या आयुष्याचे ब्लूप्रिंटस् तयार करणारी, त्यांना हातातली बाहुली बनविणारी शक्ती कशी आहे? अशा प्रकारचे चित्रण केले आहे.

जी.ए. नंतर दुसरे उल्लेखनीय नाव म्हणजे कमल देसाई यांचे जी.ए.च्या लेखनावर अस्तित्ववादाची छाप आहे. तर कमल देसाई यांच्या लेखनावर नव अनुभववाद डोकावतो.

कमल देसाई यांनी पुढीलप्रमाणे कथासंग्रह लिहिलेले आहेत. रंग (१९६२) व रंग २ (१९९८) हे कथासंग्रह त्यांच्या कथेतील अनुभवविश्व पारंपारिक मध्यमवर्गीय कौटूंबिक भावविश्व व मूल्यव्यूह यांच्या चौकटीत न बसणारे आहे स्त्रीमुक्तीची स्वतंत्र संकल्पना त्यांनी साकारली. सामाजिक संदर्भापालिकडे जाऊन स्त्री—पुरूष संवंधाचे मानसिक व अस्तित्वात्मक पातळीवरून साधलेले चित्रण हे त्यांच्या कथेचे वेगळेपण आहे.

रंग हा कमल देसाईचा पहिला कथासंग्रह रंगची नायिका सुमित्रा जोशी हिने वडिलांचा संसार सांभाळला आहे. नुकतेच धाकटया बहिणीचे लग्न लावून दिले आहे. तिला पुरूषाच्या आधाराची गरज वाटत नाही. आपण अपूर्ण आहोत असा न्युनगंडही तिच्यापाशी नाही. आपल्या दुःखाला नाव देण्याचे ती नाकारते. यानंतरच्या कथाभागात स्त्री—पुरूष नातेसंबंधात येणारी हिस्त्रंता, वैरभाव लेखिकेने मांडला आहे. पुरूषाच्या ओरबाडून, रक्तबंबाळ करून तिला आपले स्वस्त शोधावेसे वाटते. स्त्री —पुरूषांच्या नात्यात स्त्रीला स्वतःचे संपूर्ण दानच करावे लागते. हा जुना साचा पुन्हा एकदा अपरिहार्यपणे मांडला आहे. स्वातंत्र्याची अशी कोंडीत पकडणारी वाट या कथेत मांडली आहे.

इ. स. १९९४ साली लिहिलेल्या 'श्राध्द' या कथेत स्त्रीच्या जीवनाचा अर्थ नव्या मार्गाने शोधण्याच्या प्रयत्न दिसतो. परंपरा नाकारणारी स्त्री निसर्गतःच एक शक्ती आहे असा विचार या कथेत मांडला आहे. कमल देसाईच्या कथा विचारमंथनांच्या आहेत. परंपरा, नवता या धृवात हेलकावणाऱ्या प्रामाणिक धाडसी मनाचा आविष्कार आहेत.

या दृष्टीने त्यांच्या 'महादेववादी रंग', 'आम्हा घरी धन', 'तिळा बंद' या कथा विशेष अभ्यासनीय आहेत. कमलाबाईच्या कथातुन जो अनुभव व्यक्त होतो. तो अत्यंत व्यक्तीकेंद्री आहे. किंबहूना जो व्यक्तीगत, वाटावा इतका ही कथा आतमलक्षी आहे. स्वतःच्या व्यक्तीगत अनुभवातुन आपलं कथा विश्व त्या साकार करतात.

इ. स. १९७० ते १९९० स्त्री कथाकार पुढे आल्या. तारा बनारसे, विजया राजाध्यक्षा, मुधा नरवणे याच्यानंतर कमल देसाई, गौरी देशपांडे, सानिया, आशाबगे, अंबिका सरकार, सुकन्या आगाशे, प्रिया तेंडूळकर तसेच ग्रामीण कथाकारात चारूता सागर, सखा कलाल, नागनाथ कोत्तापल्ले, आनंद पाटील, मोहन पाटील, बाबाराव मुसळे हे कथाकार नजरेत भरले.

ग्रामीण कथाकारात ज्याचे नाव घ्यावे लागते ते महत्वाचे लेखक म्हणजे चारूता सागर हे होत. चारूता सागर यांचा 'नागीण' हा कथासंग्रह (१९७६) 'नदीपार' (१९७०) आणि 'मामाचा वाडा' (१९७८) ही तीनच पुस्तके असले तरी कथाकार म्हणून चारूता सागर यांनी मोठे नाव कमावलेले आहे. यांचे संपूर्ण नाव दिनकर दत्तात्रेय भोसले हे आहे.

'नागीण' या कथासंग्रहाच्या शेवटी 'असेही दिवस' या नावाचे आत्मकथन आहे. अतिशय स्वच्छ व नितळ, हे आत्मकथन हे या संग्रहाचा उत्कट भाग आहे.

माणसांचा तन्मयतेने शोध घेणे ही सागरांच्या साहित्याची रीत आहे. हा शोध घेणारे त्यांचे मन शांत, चिंतनमग्न म्हणूनच कलावंताची तटस्थता सहज धारण करणारे असे झाले आहे.

'दर्शन' या कथेत जोगतिणींच्या आयुष्याचे घडणारे दर्शन मनाला स्मिनित करणारे आहे. हे घडवून आणताना, आजपर्यंत अज्ञात राहिलेल्या दृजोगतिणीच्या खाजगी जीवनाचा तपशील सागरांनी फार मोठया आस्थेने पण कलात्मक अलिप्तपणे आपल्या समोर मांगले आहे. त्यामुळे या दर्शनाला दुःखाची व्याकुळ सुरावट लाभते आणि ते पितलेच्या लखलखीत मुखवटयासारखे गृढ व गहिरे बनत जाते.

'दर्शन' ही जागेतीणीच्या तीन पिढयांची कर्मकहाणी पुतळा ही मधल्या पिढीची प्रतिनिधी उभा जन्म देवीच्या सेवेत घालविल्यावर ती आता मरणाच्या दारात बसली आहे. आपल्या तरूण भाचीची, रूकीची वाट बघते आहे. तिचे देवपणा मानणारे भगतगण तिच्या अवतीभोवती आहेत आणि तिच्या विझत चाललेल्या डोळयामुळे तिच्या गतजीवनाचा पट उलगडत आहे.

'नागीण' ही सर्पाच्या भीतीने जखडलेल्या चंद्राची कथा, मळयाकडच्या फांदीवाटेवर डोई पडलेली नागीण फुस्करत ताठ खडी झाली. आणि नवऱ्याचे जेवन घेवून निघालेली चंद्रा मुठ मारल्यासारखी खिळून गेली. तिच्या मनाची अनावर भीती कुणालाच कळत नव्हती. माजाला आलेले दोन वाव जनावर मारल्यावद्दल सारे पांढरी गाव तिच्या वाघाची छाती असलेल्या नवऱ्याचे कौतुक करत होते. तिला मात्र लहाणपणापासून सापाची इतकी भीती की कुठे दोर दिसला तरी ती दचकूच उठायची. नवरावायकोच्या विश्रब्ध प्रेमाचे आणि नागजोडीच्या वेगवान वासनेचे चारूता सागरांनी वेधक वर्णन केले आहे.

आनंद यादव यांनी कथालेखनाला प्रारंभ केला तेव्हा त्यांची बरीचशी काव्यरचना झालेली होती. कवी प्रकृतीचे ग्रामीण कथाकार असा त्यांचा पिंड बनला. त्यांची ग्रामीण जीवनाची आत्मनुभूती, दीन दुबळयावद्दलची कणंव मातीची ओढ हे सर्व गुण जातिवंत व कसदार होते पण त्याचबरोबर गुणांना व जाणिवेला कलात्मक संघटन व आकार प्राप्त करून द्यावा असा उत्कट ध्यासही त्यांना होता. या कलात्मतेसाठी ग्रामीण कोलीभाषेच्या सामर्थ्याची कसोशीने व कलात्मक कथेने उकल करावी असे त्यांच्या मनाने घेतले.

आनंद यास्व हे ग्रामीण साहित्याच्या संदर्भात स्वतंत्र भूमिका मांडू पाहणारे कथाकार होत. खळाळ (१९८४) मराठी ग्रामीण कथेच्या विकासातला हा महत्वाचा टप्पा आहे. 'खळाळ' हा कथासंग्रह प्रसिध्द झाला आणि त्यातील 'मोट', 'धुणे' यासारख्या कथातील भाषेच्या सुरावटीने मन हर्षभरीत झाले. त्यातला थंडगार खळाळत्या लावल्याने मनाला पालवी फुटली. त्यांच्या कथेत खेडयातील जीवनाचे व्याकुळ आकलन दिसले. जीवनदर्शन व कलात्मकता यातला तोल साधने अवघड असते. जाणीवपूर्वक कलात्मकतेचा पाठपुरावा करायचे ठरवले तर हा तोल साधने अवघड असते. त्यांच्या कथेतील कथा कमी झाली व चिंतन वाढले, अलिकडे तर चिंतनात्मक लेखनाचा वेगळा प्रकारच ते रुढ करीत आहेत.

आनंद पाटील यांची 'कागुद आणि सावली' या दोन दीर्घ कथांच्या संग्रहाने त्यांचे नाव ठळक झाले. स्वतंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात ग्रामीण भाग जागा झाला. त्यांनी आपली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न सुरु केले. शेतीचे जोडधंदे उभारले. जुन्या घराची डागडूजी केलो आणि नवे घर बांधण्याचे बेत केले. यातुन भाऊबंदकी, गृहकलह यांना आवाहन मिळाले. कोर्टकचेऱ्या सुरु झाल्या आणि नोकरशाही, ग्राम पातळीवरची, शहरातली यांच्यावर विसंबून राहावे लागले. या साऱ्या उलथापालथीचा, लांडया लबाडयाचा आणि दारिद्र्याच्या कचाडयात धडपडणाऱ्या माणसांचा, बायाबापडयांच्या दुःख दैन्याचा आलेख आनंद पाटील यांनी आपल्या कथतून सादर केला आहे. त्यांच्या कथालेखनाच पाठपुरावा केला तर ग्रामीण कथेचा पुढया मुक्काम ते आपल्या नावावर मक्रुर करु शकतील.

**दलित कथा :—**

दलित कथेची परंपरा मोठी नसली तरी अल्प आहे असे नव्हे, या परंपरेची सुरुवात बंधुमाधव यांच्या कथापासून होते. त्याकाळी त्याच्यावर रंजनवादी कथांची छाया असल्यास नवल नाही. दलित जिवनाचे वास्तव आणि आंवेउकरांचे तत्वज्ञान यांनी ते प्रेरित झाले होते. त्यानंतरच्या काळात अण्णाभाऊ साठे, यांनी आपले नाव केले. ते साम्यवादी विचारांचे होते. त्यांचे साहित्य जोमदार आणि प्रेरक होते. पण दलित वास्तवाचे अग्रगण्य भाष्यकार बाबुराव बागूल हेच होत.

बाबुराव बागूलांच्या लेखनापासून दलित साहित्याचे नवे पर्व सुरु होते, असे म्हणता येईल. दलित आत्मभान हे दलित साहित्यात पृथगात्मता देणारे मुलभुत वैशिष्टये ठरते. याची नेमकी प्रचीती देणारी अशी बागूलांची कथा आहे. जेव्हा मी जात चोरली होती (१९६३) मरण स्वस्त होत आहे. (१९६९) साठनंतरच्या दशकातील दलित साहित्य चळवळीचे नेतृत्व करणारे ते अग्रगण्य साहित्यिक होत. दुःखदैन्याचे चित्रण करुन सहानुभूती जागवणे तसेच ध्येयवादी प्रवृत्तीच्या चित्रीकरणातून नैतिकतेला आवाहन करणे यापलिकडे जाऊन दलित अस्मितेचा प्रत्यय घडवणे, हे त्यांच्या कथेचे श्रेय आहे. खेडयातील दलितांच्या तसेच झोपडपट्टीत रस्त्यावर राहणाऱ्या माणसांच्या

जीवनाचे कठोर वास्तव त्यांनी समर्थपणे साकारले. जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या झगडयात माणसांच्या आदिम वासना प्रेरणांचा होणारा उद्रेक आणि तशातही तगून राहणारी माणुसकी, करूणाचा द्वंद्वात्मक वास्तवाने अस्वस्थ करणारे दर्शन त्यांनी घडविले. मानवी दुःखाच्या व्यापक संदर्भाचे भान राखणाऱ्या, नाटयात्म प्रकृतीच्या उर्जा संपन्न अशा त्यांच्या कथेने दलित कथेला एक स्वतंत्र ओळख मिळवून दिली. दलित कथेचा एक दर्जेदार नमुना, एक मानदंड निर्माण केला. १९७० नंतरच्या कालखंडातील दलित कथेवर बागूलांच्या कथेचा मोठा प्रभाव आहे. उदा. 'मरण स्वस्त होत आहे' ही कथा मुंबईत घडणारी, भिवा कदम आणि राणू नागवेकराची आणि एकूनच दलित जीवनाचा आक्रोश आणि अगतिकता सांगणारी कथा वाचकाला जागे करणारी आहे. कथालेखक व त्याचा कविमित्र झोपडपट्टीतून फिरत जातात व दुःखाची नाना दर्शने त्यांना घडतात. उदा. भिमू कदम, हैद्राबादचा चाचा पांगळा बारकू, त्याची मुलगी, तान्हा मुलगा इ. चे नवे भान यातून स्पष्ट झाले आहे.

बागूलाबरोबर अर्जुन डांगळे, योगीराज वाघमारे, केशव मेश्राम भास्कर, चंदनशीव अविनाश डोळस यांच्या कथेतील अनोखे दर्शन त्यांनी आपल्या कथेतून व्यक्त केले आहे. वामण होवाळ हे दलित कथालेखक म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांचे 'बेनवाड', 'येळकोट', 'बारसदार', 'वाटा आडवाट', त्यांचे आकलन पक्के परिवर्तनवादी आहे. त्यांची 'मजल्याचे घर' ही कथा प्रगतीवर्धक आहे.

**मराठीतील प्रयोगशील कथाकार :—**

या प्रयोगशील कथाकारात दिलीप चित्रे, श्याम मनोहर, क.वि. सोनटक्के, अनिल डांगे, विलास सारंग, राजीव नाईक, एस. डी. इनामदार यांचा उल्लेख करावा लागतो. भारत सासणे या महत्वाच्या कथाकारात परंपरा आणि प्रायोगिकता यांचे मिश्रण आढळते. त्यांचे विषय असांकेतिक असतात आणि प्रतिकांचा ते विस्ताराने उपयोग करतात.

श्री. दा. पानवलकर हे जी. ए. पेक्षा वेगळया पध्दतीचे कथाकार पण आपल्या परीने जबरदस्त पानवलकर हे कस्टम खात्यात नोकरी पत्करली या खात्यात काम करीत मुंबईत त्यांनी ३० वर्षे काढली, या काळात त्यांचे सहा कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत. 'गजगा' (१९६३) 'औंदुबर' (१९६३), 'सुर्य' (१९६८) एका नृत्याचा 'जन्म' (१९७५) 'चिनाब' (१९७८) 'ज़ांभूळ' (१९८१), औंदुबर, सुर्या 'चिनाब यांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाले आहेत.

पानवलकरांच्या कथा जोरदार घटनांनी भरलेल्या असतात. त्यांच्या संवेदनाप्रवाही कथादेखील त्यातील भाषेच्या अंतस्थ जोगामुळे घटनाप्रधान कथेचाच परिणाम साधतात. पानवल करांच्या माणसांचा जीवनाशी चाललेला संघर्ष साक्षात क्रियाशील आहे. पानवल करांची कथा ठळक घटनातून आणि दमदार भाषेतून उलगडण्याचा प्रयत्न करते. उदा. 'सूर्य' ही ज्या घरात सूर्य कधी मावळला नाही अशा पोलीस खात्यातील बाप बेटयांची आणि त्या दोघांना मुक सोशिकपणात सामावू पाहणाऱ्या आईची जबरदस्त कथा आहे.

बाप फौजदार बेटा आपल्यापेक्षा सवाई व्हावा ही त्यांची कांक्षा लाश पडली तरी बेहेत्तर पणत्याने लौकिक गाजवावा आणि घराव्यांचे नाव उजळ करावे असे बापाला वाटते असे चित्रण यात आले आहे.

भारत सासणे हे आणखी एक महत्वाचे कथाकार त्यांनी आपल्या कथासाठी असांकेतिक विषय निवडले. त्यांच्या कथेवर गुढतेचे वलय आढळते. **'कॅप आणि बाबीचे दुःख'** या पहिल्या कथासंग्रहाने त्यांनी वाचकाचे लक्ष वेधून घेतले होते. या दोन दीर्घ कथा आहेत. आधुनिक कथाकारात दीर्घकथा लिहिण्याची आवड आणि सामर्थ हे भारत सासणेच्या कथेत आहे. उदा. अस्वस्थ विस्तीर्ण 'रात्र', 'चिरदाह' ही त्यांच्या कथासंगहाची नावे या रहस्य मयतेचा प्रत्यय देतात. त्यांच्या व्यावसायिक अनुभवनावर आधारलेला ते उपजिल्हाधिकारी म्हणून शासकीय सेवेत आहेत. काही अफलातून 'कोंबडा' सारख्या कथा त्यांनी लिहिल्या आहेत. भारत सासणे हे कथाकार म्हणून पारंपारिक नाहीत तसेच परिचित अर्थाने प्रायोगिकही नाहीत. मात्र त्यांच्या कथेचा धारणा स्वातंत्र्य आणि वैशिष्टयपूर्ण आहे. तिरप्या कोनातून केलेले वास्तवाचे आकलन कसे प्रत्ययकारी करता येते हे त्यांची कथा प्रकट करते.

दिलीप चित्रे, भाऊ पाध्ये, नरेश, विलास सारंग, श्याम मनोहर, अनिल डांगे, एस. डी. इनामदार, रंगनाथ पठारे, रत्नाकर परवर्धन राजीव नाईक प्रभृती लेखक या नागर आधुनिकवादी कथाप्रवाहाला रुप देणारे कथाकार होत. मानवी एकाकीपण, तुटलेपणा, मानवी संबंधीतील अटळ दुरावा यांचा अनुभव ती मूर्त करते. अस्वस्थ आणि अंतर्मुख करणारी अशी ही कथा आहे. चिंतनात्मकता हा तिचा प्रकृतिधर्म आहे. अशा चिंतनात्म अस्तित्वलक्ष्यी कथेचा एक उत्कृष्ठ नमूना म्हणजे दिलीप चित्रे यांची कथा होय. ऑफियस (१९६८) उत्कटतेने जगणे. त्या प्रक्रियेत त्या माध्यमातून अस्तित्वाचा अर्थशोध घेणे, हे त्यांच्या लेखनातील एक प्रमुख सूत्र आहे.

मरणाच्या प्रदेशातून सौंदर्याचे व प्रतीतीचे जिवंत रहस्य स्वतःच्या कलासामर्थ्याने परत मिळविण्याच्या प्रयत्न करणारा दिलीप चित्रे यांचा 'ऑर्फियस' चिटयांची कथा वरवर पाहता मुंबईत घडते पण ही निराळे मुंबई आहे. झोपडपट्टीतली नव्हे तर बंगल्यातील, कचेरीतील हॉस्पिटल मधील, स्टेशनावरील खरे पाहता, तगराणाऱ्या अग्रशतांतून अस्तित्वाचा आशय शोधणाऱ्या संवेदनाची ही मुंबई आहे.

चित्रे यांच्या बहुतेक कथांचा निवेदक 'मी' आहे. प्रत्येक कथेतील 'मी' तोच नव्हे, पण त्याची वैचारिक, संवेदनात्मक पातळी समान आहे. 'ऑर्फियस' या पहिल्या कथेतील 'मी' एका विशिष्ट मनोवस्थेतून जात आहे. रात्रीची बियर उतरत आहे. जेवन जड झाले आहे. मित्रासोबत तो निरुद्धेशपणे हिंडतो आहे. तसाच तो गेट उघडून कब्रस्थानाच्या आवारात जातो. आतली बाग स्वच्छ 'शांत' शिस्तबंध्द आहे. त्याला वाटले, जणू काय एखाद्या प्रक्षिप्त प्रदेशात मी प्रवेश केला होता. मला तिथ वाव होता पण स्थान नव्हते. ती सोशिकपणे उतरत्या उन्हाच्या निवळत्या वर्षात उभी असलेली थडगी कायमची चूप होती. आणि माझे ओठ उघडत नव्हते. मृत्यूच्या गुढ प्रदेशात तो पोहोचला होता.

एका थडग्यावरची अक्षरे त्यांनी वाचली 'अना आव्हकियान', जन्म १७ सप्टेंबर १९३८ मृत्यु २६ डिसेंबर १९५८ किती साधं शांत, उदास, मुद्देसूद विधान होते ते! त्याचा जन्मही त्याच दिवशी त्याच वर्षी झाला होता. अॅना मात्र त्याला दिसत नव्हती. अगर कल्पिना येत नव्हती. त्यांच्यामध्ये मृत्यूचा पडदा उभा होता. ती कोण होती, कशी होती, तिचा जिवंतपणा म्हणजे काय हे कसे कळणार जिवंत पणाचा गंद नाहीसा झाल्यावर शंभर पाकळया मोजून काय कळणार मागे न पाहता 'ऑर्फियसप्रमाणे' कब्रस्थानातून तो बाहेर पडला. हॉटेलांत मध्यरात्रीच्या सुमारास तो अर्धनिद्रिस्त अवस्थेत असतांना त्याच्या खोलीत एक स्थूल रंगाचे रंगण चेहऱ्यावर थापलेली मुलगी आली क्लिओपात्राच्या ममीसारखी अंथरूणात तो तिचे नाव विचारतो. ती सांगते अॅना. कबरस्थानाच्या गेटच्या झापा उघडाव्यात तसा तिचा स्कर्ट उघड होता. जन्म मरणाचे प्रदेश जोडणारा पूल वासनेचा संभोगाचा असेल का? यावेळी तर तो तसा असेल असे त्याला वाटत नाही. मात्र याच पुलाची अनेक रुपे चित्रे आपल्या कथांतून शोधीत असतात. चियांच्या काही महत्वाच्या कथा म्हणजे **'दहा हजार शब्द'** 'जाराचं स्वागत' **'केसाळ काळंभोर पिल्लू'** व काही अशी 'स्कॉपिओ' इत्यादी कथा अभ्यासण्यासारख्या आहेत.

संदर्भग्रंथ : –


१) प्रदक्षिणा खंड दुसरा इ.स. १९४७ ते २००० रविंद्र घवी
२) मराठी कथा उगम आणि विकास – इंदुमती शेवडे
३) मराठी कथा विसावे शतक – के. ज. पुरोहित
४) मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद – दा. भि. कुलकर्णी
५) भारतीय ग्रामीण साहित्य – का. स. वाणी
६) इ.स. १९८० नंतरची ग्रामीण कथा – डॉ. मनोहर सूरवाडे